मंगळवार दि.२५ फेब्रुवारी २०२५

हे शब्द आज माझे झाले मुके तरीही !
ते बोलतील भाषा हमखास वादळाची !!
–ॲड.डॉ विजयकुमार कस्तुरे चिखलीकर

दैनिक बीड लोकनेता

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com वर्ष : ०२ अंक :१६३ किंमत २ रुपये Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in



सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!

पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी

दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)

अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !

संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४


# स्कूल बसेससाठी नियमावली लागू करणार मंत्री प्रताप सरनाईक यांची माहिती

## अभ्यासासाठी एक सदस्यीय समितीची नियुक्ती

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या खासगी स्कूल बसेस साठी येत्या नवीन शैक्षणिक वर्षापासून नियमावली निश्चित करण्यात येणार आहे . त्यासाठी निवृत्त परिवहन अधिकारी जितेंद्र पाटील यांच्या अध्यक्षतेखाली एक सदस्य समिती नेमण्यात आली असून त्यांना पुढील एक महिन्यांमध्ये या संदर्भातला अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

संपूर्ण राज्यांमध्ये शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या हजारो स्कूल बस खासगी संस्थांच्या मार्फत चालवण्यात येतात. या स्कूल बसच्या माध्यमातून अनेक संस्थाचालक पालकांची आर्थिक लुबाडणूक करत असल्याच्या तक्रारी परिवहन विभागाला प्राप्त झाल्या आहेत. त्या अनुषंगाने आज परिवहन विभागामध्ये राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. त्यामध्ये येत्या शैक्षणिक वर्षापासून या स्कूल बसेस साठी नवी नियमावली निश्चित करण्यासाठी निवृत्त परिवहन अधिकारी जितेंद्र पाटील यांच्या अध्यक्षतेखाली एक सदस्य समिती नेमण्यात आली असून या समितीने आपला अहवाल पुढील एक महिन्यांमध्ये सादर करावयाचा आहे. तसेच या संदर्भात सन २०११ मध्ये विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या रिक्षाचालकांची मनमानी रोखण्यासाठी मदान समितीने ज्या उपाययोजना सुचवल्या होत्या त्या देखील विचारात घेतल्या जाणार आहेत. या सर्वंकश अहवालाच्या अनुषंगाने नवीन शैक्षणिक वर्षापासून स्कूल बसेस साठी नियमावली निश्चित केली जाणार आहे.राज्य भरात स्कूल बसेस ज्या संस्थाचालकांच्या माध्यमातून चालवल्या जातात, त्यासंदर्भात अनेक तक्रारी पालकांच्या कडून परिवहन विभागाला प्राप्त झाल्या आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने शैक्षणिक वर्षाच्या एकूण कालावधी पैकी १० महिने या स्कूल बसेस विद्यार्थी वाहतूक करतात. परंतु प्रत्यक्षामध्ये पूर्ण वर्षाचे शुल्क एकाच वेळी संबंधितांकडून आकारले जाते. ते अवाजवी आहे. तसेच शालेय शुल्क व स्कूल बस शुल्क एकाच वेळी पालकांकडून आकारले जात असल्यामुळे त्याचा प्रचंड मोठा आर्थिक बोजा पालकांच्या वर पडतो. जे अत्यंत अन्यायकारक आहे असे अनेक पालकांचे म्हणणे होते. त्याऐवजी संबंधित स्कूल बस चालकांनी केवळ दहा महिन्यासाठीचा विद्यार्थी वाहतुकीचे शुल्क एकाच वेळी न घेता दर महिन्याला स्वीकारावे असे मत पालकांनी व्यक्त केले आहे.मध्यंतरी पनवेल आणि बदलापूर सारख्या ठिकाणी घडलेल्या घटना या अत्यंत अप्रिय आणि धोकादायक असून विद्यार्थ्यांची सुरक्षितता लक्षात घेता प्रत्येक बस मध्ये पॅनिक बटन ,आग प्रतिबंधक स्पिंकलर, ऋझड यंत्रणा, उउढत कॅमेरा आदी उपकरणे असणे आवश्यक आहे. तसेच ज्या संस्था अथवा स्कूल बस चालवणारे चालक पालकांच्या कडून विद्यार्थी वाहतुकीची शुल्क आकारतात, त्यांच्याकडे बसेस मधील सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे एकात्मिक नियंत्रण असणे आवश्यक आहे. जेणेकरून बसमध्ये भविष्यात विद्यार्थ्यांच्या बाबतीत कोणतीही अप्रिय दुर्घटना घडणार नाही. या सर्व सूचनांचा विचार करून पाटील समितीने आपला अहवाल सादर करावा अशा सूचना मंत्री सरनाईक यांनी दिल्या आहेत.



## नवीन ईजळी येथे संन्यास दिक्षाविधी सोहळा व श्रीपंचावतार उपहार महोत्सव सोहळा संपन्न




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुदखेड । किशोर मुंगल**

दि.२३ फेब्रुवारी २०२५ रोजी नवीन ईजळी ता.मुदखेड जि नांदेड येथे पंचावतार उपहार तथा संन्यास दिक्षा विधी सोहळा संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष उपाध्यक्ष वर्धनस्थ बिडकर बाबा महंत लोणारकर बाबा, महंत विद्वांस बाबा. महंत नागराज बाबा, महंत कारंजेकर बाबा महंत लासुरकरबाबा, महंत रूध्दपुरकर बाबा, सर्व महानुभाव पंथातील संत महंत अचार्य उपस्थीत होते. महानुभाव पंथांच्या तत्वज्ञानाला अनुसरून धर्मकुमार चि. देवेंद्र सुगंधराव मुंगल रा. ईजळी यांनी स्व ईच्छने सन्यास धर्मात प्रवेश केला, या प्रसंगी राजकीय मान्यवरही उपस्थीत होते, यामध्ये प्रमुख उपस्थिती आमदार श्रीजयाताई अशोकराव चव्हाण, श्री तिरुपती (पप्पू) पाटील कोडेंकर यांची पण प्रमुख उपस्थिती होती.हा कार्यक्रम खुप मोठ्या थाटात पार पडला या कार्यक्रमाचे आयोजक प.पू.म.श्री पायधन बाबा व. समस्त पायधन परीवार तथा सर्व संतभक्त मंडळी यांच्या उपस्थितीत.नविन ईजळी येथे सन्यास दिक्षाविधी सोहळा व श्रीपंचावतार उपहार महोत्सव सोहळा संपन्न झाला.

## मौ.पोखरी येथे अखंड हरिनाम सप्ताह ज्ञानेश्वरी पारायण व लक्ष्मण शक्ती सोहळ्याचे आयोजन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कापसी । बालाजी पाटील शिंदे**

दिनांक २८–०२–२०२५ रोज शुक्रवारी पोखरी येथे अखंड हरिनाम सप्ताह सुरू होत आहे– सप्ताहातील दैनदिन कार्यक्रम पहाटे ४ ते ६ काकडा भजन, सकाळी ७ ते १० ज्ञानेश्वरी पारायण ,१० ते १२ गाथाभजन, दुपारी ४ ते ५ ज्ञानेश्वरी प्रवचन, सायं ६ ते ७ हरीपाठ,रात्री ९ ते ११ हरिकिर्तन काकडा हरिपाठ गाया भजन प्रमुख विक्रम महाराज ताटे नारायण महाराज गावातील सर्व भजनी मंडळ दि.२८–०२–२०२५ वार शुक्रवार प्रवचनकार श्री ह.भ.प.माधवराव पाटील घोरबांड लाठ खुर्द किर्तनकारः श्री ह.भ.प. ओमकार महाराज मोरे आळंदी देवाची दि.१/०३/२०२५ शनिवार रोजी प्रवचनकार ह.भ.प. पांडुरंग महाराज बामणीकर ,कीर्तनकार ह.भ.प. शंकर महाराज लोंढेसोनमांजरीकर, दि.०२–०३–२०२५ वार रविवार प्रवचनकार श्री ह.भ.प.गुरुगयबीनागेंद्र महाराज पानभोसी,किर्तनकारः श्री ह.भ.प. तुकाराम महाराज पाटील चाकुरकर,दि.३/०३/२०२५ सोमवार रोजी प्रवचनकार ह.भ.प.माधव महाराज खरबीकर, कीर्तनकार ह भ प ज्ञानेश्वर महाराज आळंदी देवाची,



दि.०४–०३–२०२५ वार मंगळवार प्रवचनकार श्री ह.भ.प.मधुकर महाराज बारूळकर,किर्तनकारः श्री ह.भ.प. अर्जुन महाराज ताटे पोखरीकर दि.५/०३/२०२५ बुधवार रोजी प्रवचनकार ह.भ.प.गुरूगयबीनागेंद्र महाराज पानभोसी , दि.०६–०३–२०२१ वार गुरूवार किर्तनकारः श्री ह.भ.प. शिवाजी महाराज बोकारे यांचे किर्तन दुपारी १२ ते २ होईल. दि.०६–०३–२०२५ गुरुवार रोजी दुपारी ४ ते ५ ग्रंथाची मिरवणूक व सायंकाळी ६ वाजता लक्ष्मण शक्तीला सुरुवात होईल. गायक: ह.भ.प. गोविंद म.स. वाडी, रंगनाथ म. मडकीकर, गजानन सोनखेड, पांडूरंग महाराज, अशोक महाराज, उध्दव महाराज पिंपळगाव, माधव म., पांडरंग म.चि. भोसी, विनायक म., मोतीराम म. धानोरा, रमेश म. पांचाळ शेलगाव, पांडूरंग म. अंगद म. विठल म. निळा, परसराम म., कमल म.,पो.भोसी. मृदंगाचार्य माऊली महाराज उम्रजकर वारकरी शिक्षण संस्था, सचिन महाराज चव्हाण, नागेश म.डांगे, रामकिशन म. वानखेडे ज्ञानेश्वर ताटे, ज्ञानेश्वर म.ताटे हनमंत ताटे, परमेश्वर ताटे. भजनीमंडळ पोखरभोसी, संगुचीवाडी, चिखलभोसी, निळा,, शेलगांव, धानोरा, पिंपळगांव गुंडेवाडी, सोनखेड, मडकी, बेटसांगवी, लाठ खुर्द,पिंपरनवाडीं.दि.७/०३/२०२५ शुक्रवार रोजी ह.भ.प.मधुसुदन महाराज कापसीकर यांचे काल्याचे किर्तन होईल.व नंतर लगेचच महाप्रसादाचे वाटप होईल. सप्ताहाचे स्थळ :हनुमान मंदिर पोखरी ता.लोहा जि.नांदेड पुजारी श्री दत्ता महाराज चव्हाण व समस्त गावकरी मंडळी मौजे. पोखरी ता. लोहा जि. नांदेड.

# भोकर पोलीस स्टेशन येथे मंजुरी पैकी जवळपास अर्धेच कर्मचारी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकर । रमाकांत जोशी**

भोकर पोलीस स्टेशनला ८५ कर्मचाऱ्यांची मंजुरी असून सुद्धा केवळ ५४ कर्मचारी यातील ०७ ईतर संलग्न असून ४७ कर्मचाऱ्यावर तालुक्यातील जवळ जवळ शंभर गावचा कारभार चालत असल्याने कायदा व सुव्यवस्था काही प्रमाणात विस्कळीत झाली असून मोठ्या प्रमाणात येथील कर्मचाऱ्यांवरही कामाचा ताण वाढत असल्याने त्यांच्या आरोग्यावर तसेच मानसिकतेवर परिणाम होत असल्याचे पाहावयास मिळत आहे.

भोकर तालुका हा तसा नांदेड जिल्ह्यातील मोठा तालुका म्हणून ओळखल्या जातो. या तालुक्यात वाडी तांडे मिळून जवळपास ९५ ते १०० गावे समाविष्ट आहेत. भोकर पोलीस स्टेशन हे तेलंगाणा राज्याच्या राज्य सिमेवरील पोलीस स्टेशन असून येथे कर्तव्यावर मंजूर ८५ कर्मचाऱ्यांपैकी ५४ कर्मचारी असून त्यातून च विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालय, पोलीस अधीक्षक कार्यालय, अतिरिक्त पोलीस अधीक्षक कार्यालय, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयात ०७ कर्मचारी हे संलग्न असून केवळ




४७ पोलीस कर्मचाऱ्यावर अतिरिक्त ताण पडत असून त्याचा परिणाम कर्मचाऱ्यांच्या आरोग्यावर तसेच मानसिकतेवर सुध्दा पडत असल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे आहे. त्यामुळे रिक्त असलेली सर्व पदे त्वरीत भरणे अत्यंत अगत्याचे झाले आहे. नांदेड जिल्ह्यातील गृह खात्यामधील भोकर तालुका हा मोठा तालुका असून माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांचा मतदार संघ असल्याने त्यांचा व येथे नेते व मंत्री हे येत जात असल्याने त्यांचाही बंदोबस्त निम्म्यापेक्षा कमी असलेल्या कर्मचाऱ्यांनाच करावा लागतो. तसेच येणारे सण उत्सव, महापुरुषांच्या जयंती, पुण्यतिथी, गणेश विसर्जन, दुर्गा विसर्जन, ईद, मोहरम अशा विविध कार्यक्रमात यातूनच पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात येतो. याही उपर म्हणजे जिल्ह्यात व्हीव्हीआयपी सुरक्षा तसेच जिल्ह्यात कुठे बंदोबस्त असेल तर यातूनच कर्मचारी त्या बंदोबस्तासाठी तेथे वरिष्ठांच्या आदेशाने पाठवावे लागतात. परिणामी जवळपास ९५ ते १०० वाडी तांडे असलेले पोलीस स्टेशन निम्म्या कर्मचाऱ्यावर चालत असल्याने कर्मचाऱ्याकडे असलेले गुन्हे, तपास हे बंदोबस्तात गेल्यानंतर तसेच राहून जात असतात. त्यामुळे गुन्ह्याचा तपास पूर्ण करण्यास विलंब होतो. त्या कारणाने नागरिकांना न्याय मिळण्यासही दिरंगाई होत आहे. कर्मचाऱ्यांची संख्या कमी असल्या कारणाने गुन्ह्यांच्या तपासावर परिणाम होत आहे. गुन्ह्याचा तपास करण्यास विलंब लागत आहे. पोलीस कर्मचारी बंदोबस्त व तपास कामात व्यस्त राहत असल्यामुळे अनेक ठिकाणी चोरी, मारामारी, शहरातील झालेली विस्कळीत वाहतूक व तसेच अवैध धंद्यातही वाढ होत असल्याचे दिसून येत आहे. येथे अधिकारी व कर्मचारी यांची संख्या वाढल्यास येथील अधिकारी व कर्मचारी यांच्या वरील अतिरिक्त ताण कमी होऊन गुन्हेगारी कमी होण्यास खूप मोठी मदत होणार आहे.भोकर पोलीस स्टेशन मध्ये सध्या ०१ पोलीस निरीक्षक, ०२ सहाय्यक पोलीस निरीक्षक, ०१ पोलीस उप निरीक्षक, ०२ ग्रेड पोलीस उप निरीक्षक, ०७ बिट जमादार व ४७ कर्मचारी कार्यरत आहेत. तसेच यातुनच ईतर संलग्न कार्यालयासाठी ०७ कर्मचाऱ्यांची नियुक्ती आहे. तेव्हा वरीष्ठांनी भोकर पोलीस स्टेशन मधील अधिकारी व कर्मचाऱ्यांची कमतरता लक्षात घेऊन रिक्त पदे लवकरात लवकर भरून होत असलेली पायमल्ली दूर केल्यास तालुक्यात मोठ्या प्रमाणात कायदा व सुव्यवस्थेत सुधारणा होऊन गुन्हेगारीला आळा बसेल व कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांवरील ताणही कमी होण्यास मदत होईल.

## ग्रामपंचायत कार्यालय बामणी येथे प्रधानमंत्री आवास घरकुल योजनेचा प्रथम हप्ता वितरीत



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मालेगाव । संदीप कदम**

ग्रामीण टप्पा दुसरा (२) अंतर्गत ग्रामपंचायत कार्यालय बामणी ता. अर्धापूर जि.नांदेड येथे पात्र लाभार्थींना प्रथम हप्ता वितरण कार्यक्रमाचे लाईव्ह प्रक्षेपण दाखवण्यासाठी निमंत्रीत करण्यात आले व मंजूरी आदेश देण्यात आला त्यावेळी ग्रामपंचायत नोडल अधिकारी, मोहम्मद अझरुद्दीन अजीम ग्रामसेविका सौ.पल्लवी सोनवणे मॅडम,सरपंच सौ.शिल्पा साहेबराव कदम ,उपसरपंच सौ मनकर्णा मालोजी चितले, लाभार्थी,,ग्रामपंचायत सदस्य,ग्रामरोजगार सहाय्यक,ग्रामपंचायत कर्मचारी ईत्यादी उपस्थित होते.

# महिलांचे हक्क: समानता आणि न्याय

लोकनेता न्यूज नेटवर्क

महिलांचे हक्क म्हणजे महिलांना समाजात पुरुषांच्या समान स्थान मिळवून देण्यासाठी दिलेले स्वातंत्र्य, विशेषाधिकार आणि कायदेशीर संरक्षण. यामध्ये शिक्षण, रोजगार, आरोग्यसेवा, संपत्ती, राजकीय सहभाग आणि भेदभाव व हिंसाचारापासून संरक्षण यांचा समावेश होतो. गेल्या काही दशकांत महिलांच्या हक्कांच्या क्षेत्रात लक्षणीय प्रगती झाली आहे, मात्र अजूनही अनेक आव्हाने कायम आहेत. लिंग समानतेसाठी कायदेशीर, सामाजिक आणि सांस्कृतिक सुधारणा आवश्यक आहेत.

**महिलांच्या हक्कांचा ऐतिहासिक आढावा:**

इतिहास पाहता, महिलांना सर्वच समाजांमध्ये अत्याचार आणि अन्याय सहन करावा लागला आहे. प्राचीन काळी महिलांना मुख्यतः घरगुती जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागत आणि त्यांना राजकीय किंवा आर्थिक सत्ता मिळवण्यापासून दूर ठेवले जात असे. मध्ययुग आणि आधुनिक काळातही पितृसत्ताक रचना, धार्मिक शिकवणी आणि सामाजिक व्यवस्था यांमुळे महिलांचे हक्क मर्यादित राहिले.

१९व्या आणि २०व्या शतकातील महिलांच्या मतदान हक्काच्या चळवळींमुळे महिलांच्या समानतेच्या दिशेने मोठी पावले उचलली गेली. १९७०च्या दशकातील दुसऱ्या लहरीतील स्त्रीवादी चळवळींमध्ये कार्यस्थळी हक्क, पुनरुत्पादक आरोग्य आणि लिंग आधारित हिंसाचार यांसारख्या विषयांवर भर दिला गेला. या चळवळींमुळे उएऊ–थ (Convention on the Elimination of All Forms of Discrimination Against Women) सारख्या आंतरराष्ट्रीय करारांद्वारे महिलांचे संरक्षण मजबूत करण्यात आले.

**महिलांसाठी कायदेशीर चौकट:**

महिलांचे हक्क संरक्षित करण्यासाठी सरकारे आणि आंतरराष्ट्रीय संघटनांनी काही महत्त्वपूर्ण कायदे लागू केले आहेत:

१.सर्वसाधारण मानवी हक्कांचा जाहीरनामा (णउ्रळ) (१९४८) – पुरुष आणि महिलांना समान हक्क मिळण्याची हमी देतो.

२.उएऊ–थ (१९७९) – महिलांविरोधातील भेदभाव नष्ट करण्यासाठी आंतरराष्ट्रीय करार.

३.बीजिंग जाहीरनामा आणि कृती आराखडा (१९९५) – महिलांच्या सक्षमीकरणासाठी जागतिक कृती योजना.

४.राष्ट्रीय संविधान – भारतासह अनेक देशांच्या संविधानात महिलांसाठी विशेष तरतुदी आहेत.

**भारतातील काही महत्त्वाचे कायदे:**

कलम १४ – कायद्यापुढे समानता हमी देते.

कलम १५(३) – महिलांसाठी विशेष तरतुदी करण्याचा अधिकार सरकारला देते.

कलम ३९(अ) – समान कार्यासाठी समान वेतन देण्याची हमी.

कलम ४२ – स्त्रियांना सुरक्षित आणि न्याय्य कामाच्या परिस्थितीची हमी देते.

**महिलांच्या हक्कांना आव्हाने:**

कायदेशीर संरचना असूनही, महिलांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. त्यापैकी काही महत्त्वाच्या समस्या पुढीलप्रमाणे आहेत:

१.लिंग आधारित हिंसाचार–



महिलांविरोधातील हिंसाचार हा सर्वात गंभीर मानवाधिकार उल्लंघनांपैकी एक आहे. यामध्ये कौटुंबिक हिंसाचार, लैंगिक छळ, ऑनर किलिंग, स्त्री भ्रूणहत्या आणि मानवी तस्करी यांचा समावेश होतो. संयुक्त राष्ट्रसंघाच्या अहवालानुसार, जगातील प्रत्येक तीन महिलांपैकी एकीला आपल्या आयुष्यात कधी ना कधी शारीरिक किंवा लैंगिक हिंसाचाराचा सामना करावा लागतो. भारतात, महिला कौटुंबिक हिंसाचार संरक्षण अधिनियम (२००५) आणि फौजदारी कायद्यातील सुधारणा अधिनियम (२०१३) यांसारख्या कायद्यांमुळे महिलांना संरक्षण मिळते.

२.रोजगारातील भेदभाव आणि आर्थिक असमानता–

महिलांना कामाच्या ठिकाणी भेदभावाचा सामना करावा लागतो, ज्यामध्ये कमी वेतन, नेतृत्वाच्या संधींचा अभाव आणि लैंगिक छळ यांचा समावेश होतो. लिंग वेतन अंतर ही मोठी समस्या आहे, जिथे समान कार्यासाठी महिलांना पुरुषांपेक्षा कमी वेतन दिले जाते. भारतात समान वेतन कायदा (१९७६) आणि अमेरिका आणि इतर देशांमध्ये असलेले समान वेतन कायदे याला प्रतिबंध घालण्यासाठी लागू केले गेले आहेत.

३.पुनरुत्पादक हक्क आणि आरोग्यसेवा–

महिलांच्या आरोग्यसेवेचा, विशेषतः पुनरुत्पादक आरोग्याचा मुद्दा अत्यंत महत्त्वाचा आहे. मातृत्व लाभ अधिनियम (१९६१) भारतात महिलांना सशुल्क प्रसूती रजा देतो, तर गर्भपात कायदा (१९७१) सुरक्षित गर्भपाताच्या हक्काची हमी देतो. तरीही, ग्रामीण भागात आरोग्य सुविधा आणि कुटुंब नियोजन याबाबत जागरूकतेचा अभाव आहे.

४.राजकीय प्रतिनिधित्व आणि नेतृत्व–

महिलांचे राजकारणात आणि नेतृत्वाच्या भूमिकांमध्ये प्रतिनिधित्व कमी आहे. महिला आरक्षण विधेयक हे महिलांसाठी ३३% जागा राखीव ठेवण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे.

५.शिक्षण आणि साक्षरता–

शिक्षण हे महिलांना गरिबी आणि शोषणातून मुक्त करण्यासाठी अत्यंत प्रभावी साधन आहे. भारतात, शिक्षणाचा अधिकार अधिनियम (२००९) मुलांसाठी, विशेषतः मुलींसाठी मोफत आणि सक्तीचे शिक्षण प्रदान करतो, परंतु अजूनही ग्रामीण भागात शाळा सोडण्याचे प्रमाण जास्त आहे.

**महिलांच्या हक्कांसाठी समाज आणि सरकारची भूमिका**

महिलांच्या हक्कांचे संरक्षण करण्याची जबाबदारी केवळ सरकारची नसून संपूर्ण समाज, व्यवसाय आणि व्यक्तींनी यात योगदान दिले पाहिजे. काही आवश्यक उपाययोजना पुढीलप्रमाणे आहेत:

१) कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी – महिलांसाठी असलेल्या कायद्यांची अंमलबजावणी काटेकोरपणे केली पाहिजे.

२) शिक्षण आणि जनजागृती – शाळा आणि कार्यस्थळी लिंग संवेदनशीलता कार्यक्रम सुरू करणे आवश्यक आहे.

३) महिला उद्योजकतेला चालना देणे – आर्थिक सक्षमीकरणासाठी वित्तीय मदत आणि कौशल्य विकास यावर भर द्यावा.

४) सामाजिक आणि सांस्कृतिक अडथळे दूर करणे – रूढी आणि लिंगभेदी प्रथा संपवण्यासाठी प्रयत्न करणे महत्त्वाचे आहे.


महिलांचे हक्क हे न्याय्य आणि प्रगत समाज घडवण्यासाठी अत्यावश्यक आहेत. जरी लक्षणीय प्रगती झाली असली तरीही अजूनही अनेक अडथळे दूर करणे आवश्यक आहे. सरकार, समाज आणि व्यक्तींनी मिळून महिला समानता आणि सक्षमीकरणासाठी प्रयत्न केले पाहिजेत. महिलांना पूर्ण समानता आणि संधी मिळाल्यासच खऱ्या अर्थाने प्रगत आणि न्यायसंगत समाज निर्माण होऊ शकेल.

**–डॉ सुवर्णा कराड प्रदेशाध्यक्षा वंजारी महासंघ महिला आघाडी महाराष्ट्र**

## दुबईतील अबुधाबी येथे शिवजयंती उत्सहात साजरी

# शिवरायांचा इतिहास प्रेरणादायी आणि स्फूर्तीदायक-केंद्रीय राज्यमंत्री जाधव





लोकनेता न्यूज नेटवर्क

बुलढाणा । ज्ञानेश्वर बुधवत

### दुबई येथे महाराष्ट्र सदन बांधण्याच्या दृष्टिकोनातून प्रयत्न करणार–प्रतापराव जाधव

**आखाती देशात स्थायिक झालेल्या मराठी लोकांना एकत्र येऊन सामाजिक कार्यक्रम साजरी करता यावे यासाठी दुबईत महाराष्ट्र सदन बांधण्याच्या दृष्टिकोनातून केंद्र स्तरातून प्रयत्न करणार असल्याची ग्वाही केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी अबुधाबी येथे नागरिकांशी संवाद साधताना दिली. यावेळी उपस्थितांनी जय भवानी, जय शिवरायचा जयघोष करून घोषणेचे स्वागत केले.**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचा इतिहास प्रेरणादायी आणि समाजाला स्फूर्तीदायक असल्याच प्रतिपादन केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी अबुधाबी येथे केले.


आखाती देशांमध्ये स्थायिक झालेल्या नवीन मराठी पिढीला इतिहासाची ओळख व्हावी, या दृष्टिकोनातून दुबईतील अबुधाबी येथे इन्स्पायर इव्हेंट अँड प्रमोशन व भारतीय स्थानिक रहिवाशी यांच्या संयुक्त विद्यमाने २३ फेब्रुवारीला बी ए पी एस हिंदू मंदिर अबुधाबी येथे शिवजयंती उत्सव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव हे होते. तर अतिथी म्हणून मालोजी राजे शाहू छत्रपती, खासदार बजरंग सोनवणे उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणात बोलताना केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव पुढे म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास हा गौरवशाली असून आजच्या पिढीला प्रेरणा आणि स्फूर्ती देणारा आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या राजवटीमध्ये लोकांच्या हिताची कामे केलीत. अशा स्वरूपाची कामे भारतात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. सातासमुद्र पार छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती उत्सव साजरा केला जातो. हे मराठी माणसासाठी आणि आमच्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे. यावेळी अबुधाबी येथील मराठी माणसांसोबत त्यांनी संवाद साधला. या कार्यक्रमाला अबुधाबी येथील मराठी कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महा मंडळात एक वर्षासाठी प्रशिक्षणार्थी शिकाऊ उमेदवारांची भरती

लोकनेता न्यूज नेटवर्क

नांदेड । किरण पाटील वडजे



महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ नांदेड विभागात सन २०२५–२६ या सत्रासाठी वेगवेगळया व्यवसायासाठी एक वर्षासाठी प्रशिक्षणार्थी शिकाऊ उमेदवारांसाठी भरती करण्यात येणार आहे. या शिकाऊ उमेदवार भरतीत नांदेड जिल्ह्यातील आयटीआय/अभियांत्रिकी पदवी, पदवीका उत्तीर्ण उमेदवारांचीच शिकाऊ उमेदवार म्हणून नेमणूक करण्यात येणार आहे. नांदेड जिल्ह्याव्यतीरीक्त इतर जिल्हयातील आयटीआय/अभियांत्रिकी पदवी, पदवीका उत्तीर्ण उमेदवारांचा अर्ज व मागील तीन वर्षापुर्वी उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांचा अर्ज विचारात घेतला जाणार नाही, असे राज्य परिवहन विभागाचे विभाग नियंत्रक यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

यात मेकॅनिक मोटर व्हेईकल –४५, मेकॅनिक डिझेल– ४२, शिट मेटल वर्क्स–१८, टो इलेक्ट्रीशियन–६, मेकॅनिक रेफ्रिजरेशन अँड एअर कंडीशनर–८, पेंटर(जनरल) –४, वेल्डर (गॅस न्ड इलेक्ट्रीक)–०४, अभियांत्रिकी पदवी, पदविका (मेकॅनिकल टोमोबाईल मेकॅनिक /इंजिनीअर)–२ अशी एकुण १२९ पदे ऑनलाईन पध्दतीने भरण्यात येणार आहेत. (अनुसूचीत जाती, अनुसूचीत जमाती व दिव्यांगासाठी शिकाऊ उमेदवार कायद्यानुसार जागा आरक्षीत आहेत.) त्यासाठी आयटीआय उत्तीर्ण किंवा शिकाऊ उमेदवार भरती करण्यात येणाऱ्या विहीत केलेल्या व्यवसायाचे व्होकेशनल अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या व अॅटो इंजिनिअरींग टेक्निशिअन कोर्स उत्तीर्ण उमेदवारांना www.apprenticeshipindia.gov.in या वेबसाईटवर स्वत: चे रजिस्ट्रेशन करावे अभियांत्रिकी पदवी, पदवीका उत्तीर्ण असलेल्या उमेदवारांनी N-TS nmoQ>©bdarb www.mhrdnats.gov.in या वेबसाईटवर स्वत:चे रजिस्ट्रेशन करावे. व रजिस्ट्रेशन झाल्यावर एमआरटीसी डिव्हीजन नांदेड या आस्थापनेकरीता ऑनलाईन अप्लाय करुन रा.प. महामंडळाने विहीत नमुन्यातील छापील अर्ज भरुन सादर करणे आवश्यक राहील. हे छापील अर्ज २७ फेब्रुवारी ते १० मार्च २०२५ रोजी ३ वाजेपर्यंत शनिवार, रविवार व सुटटीचा दिवस विभाग नियंत्रक यांचे कार्यालय रा.प.नांदेड येथे मिळतील व लगेच स्वीकारले जातील. या अर्जाची किंमत खुल्या प्रवगाकरीता ५९० रुपये व मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांसाठी जातीचा दाखला सादर केल्यास २९५ रुपये आहे.

## लोकप्रिय आ.आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या हस्ते क्रिकेट टूर्नामेंट एम.एस.एम.आर. ए.प्रिमिअर लिग २०२५ चे उद्घाटन संपन्न



लोकनेता न्यूज नेटवर्क

नांदेड । गौतमराव बनसोडे

मोदी ग्राउंड,मामा चौक,नविन कौठा नांदेड येथे वैद्यकीय प्रतिनिधी संघटनेच्या वतीने भव्य क्रिकेट टूर्नामेंट एम एस एम आर ए प्रिमिअर लिग २०२५ चे उद्घाटन नांदेड दक्षिण विधानसभेचे लोकप्रिय आमदार आनंदराव पाटील बोंढारकर साहेब यांच्या हस्ते करण्यात आले..

यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख विनय पाटील गिरडे,केमिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष श्री शंतनू कोडगिरे,महाराष्ट्र राज्य वैद्यकीय परिषदेचे संचालक डॉ संजय कदम,फार्मसी कौशीलचे सदस्य रामदेव दाड,माजी जिल्हाध्यक्ष अशोक गंजेवार,मा.उपाध्यक्ष सागरदादा क्षिरसागर,राज्यपाल पुरस्कार प्राप्त असर्जनचे पोलीस पाटील खंडेराव बकाल,विठ्ठल पावडे,सुदिन पाटील बागल, संघटनेचे युनिट सेक्रेटरी श्याम पाटील वडजे,प्रदेश कार्यकारणी सदस्य मोहन पाटील,संजय हेमके,मिलिंद वजरकर यांच्यासह आदी मान्यवर व खेळाडू उपस्थित होते.याप्रसंगी वैद्यकीय प्रतिनिधी संघटनेच्या वतीने लोकप्रिय आमदार आनंदराव पाटील बोंढारकर साहेब यांचा सत्कार करण्यात आला.

# स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी विविध भागात अभ्यासिका व ग्रंथालये उभारणार: क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे

लोकनेता न्यूज नेटवर्क

इंदापूर । बबनराव धायतोंडे



भरणेवाडी ता.इंदापूर येथे मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या वतीने इंदापूर तालुक्यातील स्पर्धा परीक्षेत यश मिळवलेल्या व पोलिस भरती झालेल्या ४६ विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आयोजित केला होता.यावेळी छत्रपती साखर कारखान्याचे उपाध्यक्ष अमोल पाटील,माजी जिल्हा परिषद सदस्य प्रतापराव पाटील,सचिन सपकळ, दिपक रायकर आदी उपस्थित होते. यावेळी बोलताना मंत्री भरणे म्हणाले, इंदापूर तालुक्यातील ग्रामीण भागातील गोरगरीब कुटुंबातील विद्यार्थी आज विविध पदांवर जात असल्याचा आपणास आनंद वाटतो आहे.आपण नेहमीच विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला महत्व दिले आहे.आपण अंथूर्णे व इंदापूर येथे गरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांना मोफत वाचनालय व अभ्यासिका उपलब्ध करून दिले आहे.सध्या क्रीडा विभागाच्या अधिकाऱ्यांनी वालचंदनगर,निमगाव केतकी,कळंब आदी गावांमध्ये खेळाची ग्राउंड व अभ्यासिका उभारण्यासाठी सर्वेक्षण सुरू केले आहे.

लवकरच तालुक्यातील विविध भागात आपण अभ्यासिका उभारणार असल्याचे सांगून त्यांनी सर्वांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी महसूल सहाय्यक पदी निवड झालेल्या किशोर किसवे,विक्रम व्होरकाटे,गणेश ताटे,नवनाथ खामगळ,मैथिली शिंगाडे,अमर खारतोडे,सायली नगरे,अमोल दराडे,अंजली वाघमारे,ऋतुराज कवडे,प्रेमविजय बंडगर,सुनीता हांगे,आदित्य देवकाते,किरण चवरे,धनराज मरगळ,वनिता चिपडे,कोमल शिद,गौरी रूपनवर,रोहित गोरे,सोनाली जाधव,दीपाली घोगरे,सुनीता वाकसे,सनी लंबाते,अमोल शिंदे,राहुल इंगळे,अमोल शिंदे व सुनीता चव्हाण यांचा सत्कार झाला.तर कर सहाय्यक पदी पूजा गलांडे व सोनाली गायकवाड,अन्न सुरक्षा अधिकारी पदी धर्मराज पानसरे व मनीषा गुंजाळ,इन्कम टॅक्स अधिकारी पदी अक्षय शिंगटे,बांधकाम विभाग सहाय्यक पदी प्रविण फलफले,कॅनॉल इन्स्पेक्टर पदी मृणाल जरड यांचा तर महाराष्ट्र पोलिस दलात अक्षय गायकवाड,वैष्णवी बनसोडे,प्रिया कांबळे,सुमित जगताप,तुषार बंडगर,हिना शेख,शिवानी जाधव,काजल जाधव यांची निवड झाल्याने त्यांचा सत्कार करण्यात आला.

# महसूलमधूनही आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू निर्माण व्हावेत-महसूल मंत्री बावनकुळे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव पाटील गायकवाड**

करिअरच्या धावपळीत आपल्या अंगीभूत कलागुणांना मागे ठेवावे लागते.त्यामुळे महसूल विभागातील खेळाडूंना मिळालेली ही संधी असून कामाचे नियोजन करून कला, क्रीडा क्षेत्रामध्ये प्रावीण्य प्राप्त करावे.महसूल मधूनही राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांना गवसणी घालणारे क्रीडापटू तयार झाल्यास मला अधिक आनंद होईल, अशी अपेक्षा राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले आहे. काल रविवारी रात्री राज्यस्तरीय महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेच्या बक्षीस वितरण सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून ते उपस्थित होते.२१, २२ व २३ फेब्रुवारीला आयोजित राज्यस्तरीय स्पर्धेचा समारोप त्यांच्या हस्ते झाला.

यावेळी आपल्या संबोधनात त्यांनी क्रीडा व कलाक्षेत्रातील गुणवंतांना नोकरी बढतीमध्ये प्राधान्य दिले जाईल असे स्पष्ट केले. महसूल मधून ऑलिंपिकला गवसणी घालणारा एखादा खेळाडू तयार झाल्यास तो आनंदाचा क्षण असेल, अशी अपेक्षा व्यक्त केली.महसूल मंत्री खास महसूल कर्मचाऱ्यांच्या आग्रहास्तव आपल्या व्यस्त कार्यक्रमात नागपूर वरून नांदेड येथे समारोपीय कार्यक्रमाला उपस्थित झाले.यावेळी महसूल मधील विविध संघटना, कर्मचारी संघटना, वरिष्ठ अधिकारी यांनी देखील आपल्या मागण्या त्यांच्या समोर सादर केल्या. या कार्यक्रमाच्या व्यासपीठावर प्रामुख्याने इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास व अपारंपारिक ऊर्जा मंत्री तथा जिल्हयाचे पालकमंत्री अतुल सावे, खासदार डॉ.अजित गोपछडे,आ.बाबुराव कदम कोहळीकर, आ. तुषार राठोड,आ. राजेश पवार, विभागीय आयुक्त दिलिप गावडे, विशेष पोलीस महानिरीक्षक शाहाजी उमाप, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल,नांदेडचे पोलीस अधीक्षक अविनाश कुमार,महानगरपालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्यासह महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी व वरिष्ठ अधिकारी, महसूल मधील संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.यावेळी महसूलच्या आकृतीबंध पासून तर महसूल मधील नोकर भरतीपर्यंत अनेक विषयांवर तातडीने निर्णय घेण्याचे संकेत त्यांनी दिले. तसेच महसूल विभागाच्या



आस्थापनांमध्ये वाढ करण्याचे प्रस्ताव आहेत. राज्यात अनेक ठिकाणी अपर जिल्हाधिकारी कार्यालय, अपर तहसीलदार कार्यालय, यासोबतच लातूर किंवा नांदेडमध्ये विभागीय महसूल आयुक्तालय करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असल्याचे त्यांनी सांगितले.महसूल खात्यातील मोक्याच्या पोस्टिंग आता कुणाच्या शिफारसीने नाही तर मेरीटवर होतील, असे सांगताना त्यांनी महसूलमध्ये जवळपास १५ नवीन अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय, ६५ अप्पर तहसीलदार कार्यालय तयार करण्याचे प्रस्ताव विचाराधीन असल्याचे सांगितले. ।महसूल विभागातील कर्मचाऱ्यांनी नाविन्यपूर्ण कल्पनांवर काम करावे. शासनाला आपल्याकडच्या अशा नाविन्यपूर्ण कल्पनांची माहिती द्यावी. नव्या तंत्रज्ञानाचा वापर करावा. महसूल विभागातील सुनावण्या घेताना -ख चा वापर पुढील काळात होईल, सुनावण्यामध्ये -ख तंत्र अतिशय उपयोगी ठरणार असून, निकालपत्रासाठी -ख ची मदत घेऊ अशी घोषणाही त्यांनी यावेळी केली.

गेल्या १० वर्षात १२ हजार प्रकरणे महसूल विभागात निर्णयासाठी पडून आहेत. रोज १०० सुनावण्या घेतल्या तरी ते कमी होणार नाहीत, त्यामुळे -ख ची मदत घेणे काळाची गरज आहे, असे ते म्हणाले.नांदेड येथे १२ वर्षाच्या प्रदीर्घ काळानंतर आयोजित क्रीडा स्पर्धासाठी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले व टीमचे त्यांनी अभिनंदन केले. राज्यस्तरीय महसूल क्रीडा स्पर्धेसाठी एक कोटी अनुदान दरवर्षी देणार व दरवर्षी राज्यस्तरीय महसूल क्रीडा महोत्सव होईल, अशी घोषणा उपस्थित खेळाडूच्या समक्ष केली.यावेळी कर्मचाऱ्यांशी संवाद साधताना ते म्हणाले ,निलंबन आणि वेतनवाढ रद्द करण्याच्या फाईलवर निर्णय घेण्याची वेळ महसूल मंत्र्यांवर आणू नका, इतके चांगले कामकाज ,जनतेशी समन्वय, कार्यालयीन शिस्त आणि पारदर्शी राहा, महसूल हा महाराष्ट्राचा चेहरा आहे. महसुल खाते क्रमांक एकचे राहील यासाठी प्रयत्न करा असे आवाहनही त्यांनी केले.यावेळी त्यांच्या हस्ते विभागीय स्पर्धेतील विजेते कोकण विभागाला प्रथम, दुसरा क्रमांक यजमान छत्रपती संभाजी नगरला तर पुणे विभागाला तिसरा क्रमांकाचे सर्वसाधारण विजेतेपद बहाल करण्यात आले.

# तथागत गौतम बुद्धाच्या होणाऱ्या स्मारकासाठी समाजाने एकत्र यावे-सुरेश गायकवाड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नायगाव । माधव बैलकवाड**



महाराजा सयाजीराव गायकवाड नगरी देगाव येथे तथागत गौतम बुद्ध यांच्या स्मारक बांधकामासाठी समाज बांधवांनी एकत्र येणे गरजेचे आहे कारण हे स्मारक नायगाव तालुक्यातील बहुजन हिताय बहुजन सुखाय हे वाक्य जोपासण्याच्या संकल्पनेतून उद्या निर्माण होणाऱ्या सिद्धार्थ भगवान बुद्धाची मूर्ती ही समाजासाठी प्रेरणादायी ठरेल असे उद्गार आंबेडकरी चळवळीचे ज्येष्ठ नेते सुरेश गायकवाड यांनी माता रमाई जयंती महोत्सवात व्यक्त केले. नायगाव शहरापासूनच जवळ असलेल्या महाराजा सयाजीराव गायकवाड नगरी देगाव येथे माता रमाई जयंती महोत्सव निमित्त आयोजित कार्यक्रमात अध्यक्षस्थानी देगाव नगरीचे भूमिपुत्र तथा आंबेडकरी चळवळीचे ज्येष्ठ नेते सुरेश गायकवाड तर प्रा. केशव पवार उत्तमराव मोरे सुभाष मोरे, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या रेखाताई बनसोडे, महानंदा गायकवाड, ग्रामसेवक अडकिने, छत्रपती मोरे ,भास्कर भेदेकर, नागसेन जिगळेकर, व्यंकटराव इंगळे, नागोराव डुमणे, अनिल शिरसे, रमेश धुळेकर, संभाजी पवार, अंकुश हनुमंते, गंगाधर गायकवाड यांची प्रमुख उपस्थित होते, सदर कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रसिद्ध शाहीर चंद्रकांत गायकवाड देगावकर यांचा बुद्ध भीम गीताचा कार्यक्रम संपन्न झाला. यानंतर मा रमाई हे एक पात्री नाटक अभिनेत्री प्रियंका उबाळे यांनी सादरीकरण करून उपस्थित रसिकाची मने जिंकली तर सुप्रसिद्ध गायिका भाग्यश्री इंगळे यांचाही संचाने बुद्ध भीम गीते सादर करून समाज प्रबोधन केले या कार्यक्रमात सामाजिक जेष्ठ कार्यकर्त्या रेखाताई बनसोडे शेळगावकर यांनी शंभर पाण्याचे थंड कॅन,ग्लास देऊन आपली सेवा बजावली या कार्यक्रमासाठी नायगाव तालुक्यातील समाज बांधव मोठ्या प्रमाणात उपस्थित होते तर सदर कार्यक्रमांचे सूत्रसंचालन राहुल गायकवाड यांनी तर आभार कार्यक्रमांचे आयोजक अविनाश गायकवाड यांनी मांडले.

# सिंदखेड राजा येथे संत गजानन महाराज प्रगटदीन उत्सवात साजरा

## आठशे लोकांनी घेतला महाप्रसादचा लाभ

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । प्रतिनिधी**

गजानन महाराज यांच्या प्रकट दिनानिमित्त शिवशक्ती नगर नगरपरिषद जवळ सिंदखेड राजा या ठिकाणी महाप्रसादाचा आयोजन करण्यात आलं होतं याप्रसंगी शेकडो लोकांनी या महाप्रसादाचा लाभ घेतला असून या कार्यक्रमाला अनेक मान्यवर यांची उपस्थिती लाभली होती. नाजीर काझी जिल्हा अध्यक्ष राष्ट्रवादी, मा.आमदार तोताराम कायंदे ,मा.नगर अध्यक्ष देविदास ठाकरे , कृषी उत्पन्न बाजार समिती उपाध्यक्ष विष्णू मेहेत्रे,मा.नगर अध्यक्ष सतीश तायडे,मा.नगर अध्यक्ष दे.राजा मालती कायंदे ,योगेश म्हस्के,शाम मेहेत्रे, गजानन मेहेत्रे पत्रकार, वैभव मीनासे, जाधव, भजणी मंडळी व असंख्य नागरीकांनी महाप्रसादा चा लाभ घेतला. प्रगट दिनासाठी गजानन



महाराज संस्थान मध्ये काम करत असलेले गाडेकर महाराज देखील उपस्थित होते. मागील १३ वर्षा पासून संजय सोनुने हे त्यांच्या शिवशक्ती नगर येथील घरी गजानन महाराज प्रगट दीन साजरा करतात व महाप्रसादाचे आयोजन ते करत असतात. दरवर्षी प्रमाणे याही वर्षी मोठ्या उत्सवात प्रगटदीन साजरा करून महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

# कुष्णूर एमआयडीसी मध्ये उद्योग निर्माण झाले तर शेतकऱ्यांचा फायदा-खा.प्रा.रविंद्र चव्हाण

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नायगाव । माधव बैलकवाड**



प्रत्येक भागात उद्योग प्रक्रिया सुरुवात झाली पाहिजे आणि शेतकऱ्यांनी आपली शेती एक बिजनेस म्हणून करावी आपण मोठ्या कष्टाने शेतात उत्पन्न घेतो पण त्याचे वितरण होण्यासाठी कुष्णूर एमआयडीसीमध्ये विविध उद्योग निर्माण झाले तरच त्याचा पुरेपूर फायदा शेतकऱ्यांना होईल असे मत खा. प्रा.रवींद्र पाटील चव्हाण यांनी महालक्ष्मी हळद प्रक्रिया उद्योग शुभारंभ कार्यक्रमात व्यक्त केले.

महालक्ष्मी हळद प्रक्रिया उद्योगाचे अध्यक्ष तथा नगरसेवक दयानंद भालेराव यांनी निर्माण केलेल्या महालक्ष्मी हळद प्रक्रिया उद्योग या फर्मचा शुभारंभ सोहळा प्रसंगी उद्घाटक म्हणून खासदार प्राध्यापक रवींद्र पाटील चव्हाण यासह श्रीनिवास पाटील चव्हाण, उपनगराध्यक्ष विजय पाटील चव्हाण, सय्यद रहीम शेठ, डॉ. शंकर गड्डमवार, बालाजी मद्देवाड, माधवराव पाटील जाधव, संजय पाटील चव्हाण,रावसाहेब पाटील जाधव, पंढरीनाथ भालेराव, रवींद्र भालेराव, विजय भालेराव सूर्यकांत सोनखेडकर, रा.ना. मेटकर, उत्तम गवाले, शंकर गायकवाड यांच्या उपस्थितीमध्ये महालक्ष्मी हळद प्रक्रिया उद्योगाचे शुभारंभ करण्यात आले. दयानंद भालेराव कुटुंबाच्या वतीने मान्यवर व पाहुण्यांचा सन्मान करण्यात आला, आपल्या प्रस्ताविकपर मनोगतात नगरसेवक भालेराव म्हणाले की, मी एक शेतकरी असल्याने हळद उत्पन्न घेतले पण त्याच्या वितरणासाठी काय त्रास झाला हे लक्षात आल्यानंतर इतर शेतकऱ्यांना असा त्रास होऊ नये यासाठी महालक्ष्मी हळद प्रक्रिया उद्योग निर्मिती करण्यात आली आपण सर्वांनी मला सहकार्य करावे असेही त्यांनी अपेक्षा केली. यावेळी, प्राचार्य बाबासाहेब शिंदे, नगरपंचायत नायगाव येथील लेखापाल रामेश्वर बापूले, माधवराव पाटील पळसगावकर, माणिक पाटील चव्हाण, प्रल्हाद पाटील होटाळकर सरपंच रणजीत पाटील कुरे,बाजीराव पाटील हिप्परगेकर, तेजराव पाटील चोंडे, कामाजी वाघमारे, शकील शेठ,पंडित तेलंग, संतोष गाडगेराव, इंजी. स्वप्निल भालेराव खादी ग्रामोद्योगाच्या माजी सदस्या सौ माधवी भालेराव,कु.कल्याणी भालेराव, लक्ष्मीकांत भालेराव यासह कुष्णूर परीसरासह नायगाव तालुक्यातील शेतकरी बांधवांची उपस्थिती होती सदर कार्यक्रमांची सूत्रसंचालन व आभार मुख्याध्यापक उत्तम गायकवाड यांनी मानले.

## गुरु रविदास जयंती निमित्त शेषराव पाटील यांना

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजरत्न राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**माहूर । राजकिरण देशमूख**

अखिल भारतीय आंबेडकरी साहित्य संस्कृती संवर्धन महामंडळ आणि मौलिक अधिकार समाजसेवा मंडळ आदिलाबाद तेलंगणा यांच्या वतीने गुरु रविदास फेस्टिवलमध्ये माहूर येथील शिक्षक शेषराव पाटील यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजरत्न राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.



तेलंगणातील आदिलाबाद मधील लक्ष्मीनगर येथील गुरु रविदास मंदिरात संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष गुरु रविदास फेस्टिवल आदिलाबादचे अध्यक्ष मधु बावलकर होते. तर जेष्ठ साहित्यिक चंद्रप्रकाश देगलूरकर, प्रशांत वंजारे, गजानन सोनोने, अशोक वासाटे, राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षक रमेश मुनेश्वर आदी उपस्थित होते.गुरु रविदास जयंतीच्या निमित्ताने सामाजिक, साहित्यिक, शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. शेषराव पाटील यांना तेलंगणाचे माजी मंत्री जोगू रामन्ना यांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. पाटील हे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नवी आबादीचे उपक्रमशील शिक्षक आहेत. अखिल भारतीय शिक्षक साहित्य कला क्रीडा मंडळाचे मराठवाडा विभागीय सचिव आहेत, तसेच महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे तालुका अध्यक्ष आहेत. त्यांचे अनेक लेख कविता वर्तमानपत्रातून प्रसिद्ध झालेले आहेत. नांदेड जिल्ह्याचा आदर्श जिल्हा पुरस्कार सुद्धा त्यांना मिळालेला आहे.पुरस्कार मिळाल्याबद्दल राष्ट्रसंत साईनाथ महाराज वसमतकर, नगराध्यक्ष फिरोज दोसाणी, अभियंता प्रशांत ठमके, गटशिक्षणाधिकारी कृष्णा भराडीया, उत्तम कानिंदे, भाग्यवान भवरे, विजय घाटे, सुधिर जाधव, मिलिंद कंधारे, रणजित वर्मा, शाम राठोड, संजीव वाठोरे, डॉ.अरुण धकाते आदिनी त्यांचे अभिनंदन केले आहे.



**नांदेड जिल्ह्याचे लोककल्याणकारी नेते श्री मारोतराव पाटील कवळे गुरुजी यांनी २४ फेब्रुवारी रोजी उमरी येथे उमरी नगर पालिकेचे माजी नगराध्यक्ष म.खाजा म हुसेन यांच्या कन्येच्या विवाह सोहळ्याला उपस्थित राहून आशीर्वाद दिला. यावेळी अनेक मान्यवर उपस्तित होते(लोकनेता न्युज नेटवर्क नांदेड)**

# शहापूर येथे दर्गा संदल हिंदू-मुस्लिम बांधवांच्या वतीने उत्साहात साजरा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**देगलूर । जयपाल दावनगीरकर**

देगलूर तालुक्यातील शहापूर येथे खाजा गरीब नवाज बाबा, हाजी मलंग बाबा, हाजी सुल्तान शाह बाबा, मौलाली बाबा, प्यार साहब बाबा, इस्माईल कादरी दर्गा या ठिकाणी दरवर्षीप्रमाणे याही वर्षी हिंदू व मुस्लिम बांधवांच्या वतीने जात पात न मानता एकजुटीने एका मनाने मोठ्या उत्साहात संदल साजरा करण्यात आला आहे. दर्गा कमिटीचे मानकरी व अध्यक्ष सटवा महाराज आरोटे यांच्या घरातून सकाळी दहा वाजता सुर, सोनई, बाजा बजंत्री वाजत गाजत गावकऱ्यांच्या वतीने संदल रॅली काढण्यात आली त्यानंतर संध्याकाळी महाप्रसादाचा आयोजन करण्यात आला तसेच कव्वालीचा शानदार कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.



खाजा गरीब नवाज बाबा, हाजी मलंग बाबा, हाजी सुल्तान शाह बाबा, मौलाली बाबा, प्यार साहेब बाबा, इस्माईल शाह कादरी दर्गा व परिसरात लाईटिंगची रोषनाई देखील करण्यात आली होती. दर्गा कमिटीचे अध्यक्ष सटवा रामा आरोटे यांनी सर्व भाविक भक्ताचे आभार मानले, यावेळी त्यांचे चिरंजीव संतोष सटवा आरोटे, शहापूर नगरीचे सरपंच लक्ष्मण भंडारे, पोलीस पाटील तुळशीराम पाटील,पोलीस प्रशासन व आजी-माजी सदस्य पत्रकार,मैनोदीन शेख,जावेद शेख, गावकरी व परिसरातून जमलेल्या भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रयतेचे कल्याण हाच स्वराज्याचा आत्मा आणि तेच राज्यकारभाराचे आत्यंतिक धोरण हीच रयतेच्या राजाची खरी ओळख-डॉ. विजयकुमार कस्तुरे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**धुळे । प्रतिनिधी**






नुकत्याच धुळे जिल्ह्यातील अवधूत प्रकाशन संस्था तसेच अव्यक्त अबोली बहुउद्देशीय संस्था, पूलगाव, वर्धा या ऊभय साहित्य संस्थांच्या संयुक्त विद्यमाने दुसाने, ता. साक्री, जि. धुळे येथे दि. १६-०२-२०२५ रोजी, या वर्षीच्या छ. शिवाजी महाराज जयंती उत्सवा निमित्त आयोजित ७ व्या राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलनातील - छत्रपती शिवाजी महाराज : रयतेचा राजा - या विषयावर आयोजित परिसंवादाच्या अध्यक्षपदावरून बोलताना, बहुजन साहित्य संघ, चिखली चे अध्यक्ष तसेच सामाजिक सेवेनिमित्ताने अमेरिकन विद्यापीठाकडून मानद डॉक्टरेट पदवीने तथा महाराष्ट्रच नव्हे तर गोवा, गुजरात, कालिकत, केरळ, कर्नाटक सह दिल्ली , काठमांडू नेपाळ इत्यादी ठिकाणच्या विविध संमेलनात वेगवेगळ्या पुरस्कारांनी, सन्मानित ज्येष्ठ साहित्यिक, कवी, पथनाट्य कलावंत, दिग्दर्शक, हरहुन्नरी कलाकार अभिनेता डॉ. विजयकुमार कस्तुरे यांनी वरील प्रमाणे भाष्य करून जनसामान्यांच्या हितास व्यवस्था जर बाधक ठरत असेल तर त्याला छेद देण्यासाठी व रयतेचे कल्याण साधण्यासाठी प्रसंगी आपल्या लेखणीची बंदूक अन् शब्दांची गोळी ठरणारे साहित्य आविष्कृत करण्याची जबाबदारी सर्व साहित्यिक व कवींची असून समाजाचे घटक या नात्याने त्यांनी हे व्रत स्वीकारले पाहिजे, असेही भावपूर्ण आवाहन साऱ्या साहित्यिक मंडळींस केले. यानिमित्ताने परिसंवादातील वक्ते आयुष्मान योगेश ताटे, यवतमाळ यांनी सुध्दा हाच विचार आपल्या भाषणातून मांडला. तसेच या निमित्ताने आयोजित कवी संमेलन प्रसंगी, सूत्र संचालकांच्या विनंती वरून, आपल्या परकायाप्रवेशी कथाकथनासाठी साऊथवेस्टर्न अमेरिकन विद्यापीठातर्फे मानद डॉक्टरेट प्राप्त कथाकार कवी डॉ. बबनराव महामुने, छ. संभाजीनगर यांनी त्यांच्या बहुचर्चित, उलगडा या कथेच्या सादरीकरणा सोबतच, भाकरीचा सुवर्ण महोत्सव या हृदयाला पीळ पाडणाऱ्या कवितेने उपस्थितांना अविचल करून टाकले. या संमेलनात भावकवी अंकुश पडघान, बोरगाव काकडे, चिखली, बुलढाणा, दिलीप थूल, पूलगाव, पूजा सोनार, योगेश ताटे इ. अनेक कवींनी विविध सामाजिक ज्वलंत विषयांवरील कविता सादर करून रसिक प्रेक्षकांना कधी मंत्रमुग्ध केले तर अवघ्या देशांतर्गत आजच्या ग्लोबलायझेशनच्या नांवा खाली भ्रामक झगमगाटात मोडकळीस आलेल्या कुटुंब संस्थेला नवा आत्मीयतेचा श्वास देवू पाहणाऱ्या व सबंध देशातच नाही तर अंतर्राष्ट्रीय स्तरावर विविध पुरस्कारांनी गौरविण्यात आलेल्या - त्या तरूच्या सावलीला, चल सखे बोलू जरा - या मानवी अंतरंगास स्पर्श करणाऱ्या कविता गायनाने, कधी सारा माहोल निश्चल करून डॉ . विजयकुमार कस्तुरे यांनी या संमेलनास वेगळ्याच उंचीवर नेऊन दाद मिळवली. मा. मनोहर शहारे, यवतमाळ यांच्या अध्यक्षतेखाली, मा.शिवाजीराव पाटील दुसानेकर यांच्या समर्थ स्वागताध्यक्षत्वाने व मा. कपिलजी कलंभे, देवळी यांच्या हस्ते उदघाटित झालेल्या ह्या संमेलनात विविध क्षेत्रातील मान्यवर साहित्यिक कलावंत, तोंडाय आक्का म्हणून प्रसिद्ध असलेल्या खान्देशी अभिनेत्री मा. विद्या भाटिया, मराठी चित्रपट गायिका मा. गायत्री राजपूत, सुप्रसिद्ध खान्देशी गायक प्रशांत देसले तसेच अभिनेता व दिग्दर्शक म्हणून ओळख असलेले खान्देशी कलाकार मा. अरूण महाराज आणि इतरही वैचारिक प्रबोधनपर क्षेत्रातील मान्यवर मंडळींना सन्मानासह पुरस्कारांनी गौरविण्यात आले. या संमेलनाच्या माध्यमातून अनेक लेखक कवींना आपली आगळीवेगळी ओळख प्रदर्शित करता आली. आयोजक अवधूत प्रकाशन संस्थेच्या मा. ड. रविना पाटील, दुसाने यांनी तसेच मा. जयश्री चव्हाण, पूलगाव यांनी व त्यांच्या मंडळातील सर्व तरूण साहित्यिक कवी कार्यकर्त्यां महिला पुरुष तथा गावकरी मंडळी व महात्मा फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, दुसाने च्या मा. मुख्याध्यापक, शिक्षक तसेच सर्व कर्मचारी वृंदाने हे संमेलन पूर्णार्थाने यशस्वी केले.

# नाच गाण्यावर लाखो रुपये खर्च करून महसूल क्रीडा महोत्सवाला निधी देणा-या आमदारांना दिव्यांगाचा पडला विसर

## जिल्ह्यातील दिव्यांग निधीसाठी झिजवतात आमदारांच्या ऑफिसच्या पायऱ्या

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड। गोविंद मोरे**

नांदेड शहर व संपूर्ण जिल्ह्यामध्ये दिव्यांगांची मोठ्या प्रमाणात संख्या असून त्यांना नैसर्गिक दिव्यांगत्वामुळे रोजी रोटी कमाविणे अवघड झाले आहे. मजुरीही करता येत नाही त्यामुळे अनेक दिव्यांगांवर उपासमारीची वेळ आली आहे तर दुसरीकडे राज्य शासनाच्या वतीने दिव्यांगांसाठी आमदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रम अंतर्गत दिव्यांगांना दरवर्षी ३० लक्ष रूपये निधीची तरतूद करण्यात आली आहे. तसेच त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी लाखो रुपयांचा निधी त्यांच्याकडे वर्ग केला जातो परंतु जिल्ह्यातील आमदाराने दिव्यांगाचा निधी खर्च न करता जागेवरच ठेवून दिल्यामुळे दिव्यांगांवर उपासमारीची वेळ आली आहे तर दुसरीकडे नुकत्याच राज्यस्तरीय महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा नांदेड शहरात संपन्न झाल्या आहेत त्यासाठी आमदारांनी ८० लाखांचा निधी देऊन नाच गाण्यांवर उधळला आहे. यावरून दिव्यांगांमध्ये नाराजी पसरली असुन नुकतेच जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे हे नांदेड दो-यावर आले असता बेरोजगार दिव्यांग



कल्याणकृती संघर्ष समीतीचे अध्यक्ष राहुल साळवे यांनी पालकमंत्र्यांकडे निधीबाबत प्रश्न विचारला असता त्यांनी यावर आढावा घेऊन त्वरित निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले आहे.जिल्ह्यात आमदार व खासदारांना दिव्यांगांच्या उन्नतीसाठी मंत्रिमंडळाकडून निधी दिला जातो. तो निधी दिव्यांगांच्या कल्याणासाठी खर्च करण्यासाठी प्रत्येक आमदारांच्या कोठ्यात असतो परंतु जिल्ह्यातील नऊ आमदारांनी दिव्यांगांसाठीचा राखीव निधी वापरलाच नसून तो निधी दुसरीकडे वापरून एक प्रकारे दिव्यांगांवर अन्याय करताना दिसत आहेत. नुकत्याच झालेल्या महसूल क्रीडा स्पर्धांवर आमदार फिदा होऊन नाच गाण्यांवर ऐंशी लाख रुपये त्यांनी उधळे आहेत परंतु दिव्यांग आजही एक वेळच्या जेवणासाठी व जीवन जगण्यासाठी तारेवरची कसरत करताना दिसत आहे . राज्य शासनाने दिव्यांगांना अद्यापही दिलासा दिला नसून त्यांची फरफराट अद्यापही संपली नाही. काही जणांचे हातपाय अपंग आहेत त्यांना चालता येत नाही तर काही जणांचे डोळे नाही अंधत्व आलेले आहे. तर काहि जनांना बोलता ऐकता येत नाही अशा अनेक दिव्यांगांना उपासमारीमुळे नाईलाजाने रस्त्यावर येऊन भिक मागून आपली उपजीविका चालवावी लागत आहे परंतु आमदार खासदार व प्रशासनाला यांची क्यू येताना दिसत नाही असे राहुल साळवे यांनी आज एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे म्हटले आहे.

# शेतकऱ्यांवर रानडुकराचा हल्ला ;एक गंभीर तर एक स्थिर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**शिराढोण । दौलत पांडागळे**



कंधार तालुक्यातील शिराढोण येथील दोन तरुण शेतकरी रमेश शिंदे आणि बापूराव पवार हे शेतात काम करत असताना अचानक जंगली रानडुकराने त्यांच्यावर हल्ला केला या हल्यात रमेश शिंदे याला गंभीर दुखापत झाली असून बापूराव पवार यांचा पाय फॅकचर झाला आहे.

सविस्तर माहिती अशी की शेतकरी रमेश शिंदे हे चारा कापून डोक्यावर भारा घेऊन निघाले असता अचानक मागून येऊन रानडुकराने धडक दिली आहे खाली पडल्यावर अंगाचे लचके काढले आणि गंभीर जखमी केले आणि बापूराव पवार यास पाटीवर पिचकारी असताना धडक दिली जवळ जवळ असलेल्या शेतात काम करत असताना हा प्रकार घडला असून यामध्ये रमेश शिंदे याच्यावर विष्णुपुरी येथील शासकीय रुग्णालयात उपचार सुरु असून बापूराव पवार याच्या पायाला पण प्लास्टर करण्यात आले आहे. सदरील घटनेमुळे शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून वनविभागाकडून अशा मोकाट प्राण्यांचा लवकरच बंदोबस्त करावा लागेल अन्यथा अश्याच घटना जर घडत राहिल्या तर त्यास वनविभाग सर्वस्वी जबाबदार असेल असा सूर जनतेतून निघत आहे.

# ३८ वर्षापासून प्रलंबित घराच्या मावेजासाठी धरणग्रस्त कुंटुबियांचे ४ दिवसांपासून उपोषण



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुखेड । शिवकुमार बिरादार**

लेंडी प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रातील मौजे रावणगाव येथील सहा कुंटूबांस घराचा मावेजा ३८ वर्षापासून मिळालेच नाही. यामुळे ४ दिवसांपासून संबंधित धरणग्रस्त कुंटुबियांनी ग्रामपंचायत कार्यालयासमोर उपोषण सुरू केले आहे. जोपर्यंत आमचा मावेजा आम्हाला मिळणार नाही तोपर्यंत उपोषण मागे घेणार नसल्याचा पवित्रा उपोषणकत्यांनी घेतला आहे. संबंधीत विभागाच्या जाणीवपूर्वक चुकीमुळे रावणगाव येथील ६ उपाषण कर्त्यांचा गेल्या ३८ वषार्पासून घरांचा मावेजा न देता त्यांना वंचित ठेवून त्यांच्यावर घोर अन्याय केलाआहे. यात मिळकत क्रमांक ग्रामपंचायत नमूना नंबर ८ अ वर नोंद आहे. तो ही सन १९८६/१९८७ ते आजतागायत नोंद आहे. शासन निर्णय असा आहे की बुडीत क्षेत्रातील गावठान मधील एक घर किंवा शेतजमीनीतून एक गुंठा जर राहिला असेल तर त्यांचा मावेजा देण्यात यावा. जोपर्यंत नोटिसा मिळणार नाहीत तोपर्यंत उपोषण चालु रहाणार असल्याचेही उपोषणकर्त्यांनी सांगितले. उपोषणकत्यार्च वडीलोपार्जीत घरे असून सुद्धा शासन मावेजा देण्यास आजपर्यंत चालढकल करीत आहे. यामुळे शिवसेनेचे अल्पसंख्याक विभागाचे जिल्हाप्रमुख शेख जैनोदीन पटेल घर क्रमांक २३९ यांच्यासह बालाजी लक्ष्मण चिंतलवाड २५३, भरत भगवानलाल श्रिवास्तव १५४, सुभाष लक्ष्मण दाचावार ५८, खाजा हैदरशा २५/१, रहेमान हैदरशा २५/२ हे सहाजण उपोषणास बसले आहेत. ६ जणांनी उपोषण सुरु केले आहे. या उपोषणाची दखल घेत तहसिल कार्यालय महसुल विभागाचे नायब तहसीलदार एस.एफ. मामीलवाड यांनी उपोषणस्थळी भेट दिली. घराच्या मावेजाच्या नोटीसा मिळत नाहीत तोपर्यंत आमचे उपोषण सुरुच राहणार असा पवित्रा उपोषण कर्त्यांनी घेतला आहे.

# श्री जनेश्वर महादेव मंदिर जवखेडा ठेंग प्रतिवर्षीय प्रमाणे शिवपंचायतन यज्ञ हनुमंतरायांची प्राणप्रतिष्ठा सोहळा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकरदन । राम शिंदे**



जाफराबाद तालुक्यातील जवखेडा ठेंग येथील श्री क्षेत्र जनेश्वर महादेव मंदिर रात प्रतिवर्षी शिवपंचायतन यज्ञ सोहळा मोठ्या थाटात पार पडला सविस्तर माहिती अशी की श्री राष्ट्रसंत सद्गुरू जनार्दन स्वामी महाराज गोसेवा आश्रम श्री शेत्र जवखेडा परम पूज्य श्री स्वामी माधव माधव गिरीजी बाबा परमपूज्य श्री ज्ञानेश्वर माऊली सर्व संतांच्या उपस्थितीत यज्ञ सोहळा मोठ्या थाटामाटात करण्यात आला जिल्ह्याचे स्वच्छता धुत श्री पंजाबराव भुजंगराव लहाने यांचा या यज्ञ सोहळा स्वच्छतेचे धूत म्हणून समस्त गावकरी सर्व कमिटीच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आला या पाच दिवशीय यज्ञ सोहळा मध्ये स्वच्छता ठेवून आपले मोलाचे सहकार्य या ठिकाणी श्री पंजाबराव लहाने यांनी श्रमदानातून सहकार्य केले या पाच दिवस यज्ञ सोहळ्यात संत महतांच्या उपस्थितीमध्ये हा यज्ञ सोहळा मोठ्या आनंदात साजरा करण्यात आला या कार्यक्रमासाठी परिसरातील भाविक भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला आजी-माजी पदाधिकारी सरपंच उपसरपंच चेअरमन सभासद सर्वांचे सहकार्य लाभले.

# हत्ता नाईक येथे जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**

सेनगाव तालुक्यातील हत्ता नाईक येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले चिमुकल्यांनी नृत्यकला सादर केली होती तर चिमुकल्यांनी उपस्थितांचे यांचे मनमोहन घेतले आहे शाळेचे मुख्याध्यापक घुगे सर यांनी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले सहकारी तडकसे सर, महाजन मॅडम, गव्हाणे सर ,थिटे सर गायकवाड सर, देशमुख सर ,वैष्णवी मॅडम आदींनी सहकार्य केले तर या संस्कृती कार्यक्रमात हत्ता नाईक येथील गावातील भजनी मंडळ नामदेव कुडलिक ठोके, विठ्ठल राणुजी कांबळे, रतन महादू ठोके, शिंदेधन पुंजाजी ठोके मोहन रामभाऊ कांबळे यांच्या वतीने गायनातून समाज प्रबोधन करण्यात आले आहे.



हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904